# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☏ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in

अति तात्काळ

जा.क्र.तंशिविकापु/विधि/जात वैधता/२०१९/ 4158

दिनांक :- 05 OCT 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदवी संस्था,
अभियांत्रिकी महाविद्यालय, एम.बी.ए एम.सी.ए, औषधनिर्माण शास्त्र,वास्तुशास्त्र
पुणे विभागा, पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न करणेबाबत आणि संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या त्रुटीबाबत प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता नसलेल्या तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर न केलेल्या प्रकरणांबाबत अहवाल सादर करणेबाबत..

संदर्भ :- १) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०१९/३२४ दिनांक १८/०९/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदवी संस्थाना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता सादर करण्यासाठी दिनांक २५/०८/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, तथापि या मुदतीत जे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत. अशा विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय तपशीलवार माहिती अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करणे/रद्द न करणे या बाबत स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी शासनाने माहिती मागितली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय तपशीलवार माहिती खालील विवरणपत्रात या कार्यालयाच्या info.ropune@gmail.com या मेल आडीवर दिनांक ५/१०/२०१९ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत(Soft copy ) सह सादर करण्यात यावी.

विविरणपत्र अ ) मुद्दा क्रमांक १ संदर्भाने माहिती

| Sr. No. | Course Name | Name of the Institute | No. of students Admission cancelled due to non-submission of Caste Validity Certificate up to 30.08.2018 of DSE Engg. | Student Name, Application ID & Caste information who have not submitted their caste validity certificate | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Application ID | Name of Student | Cast |
| | | | | | | |

विविरणपत्र ब ) मुद्दा क्रमांक २ संदर्भाने माहिती (१)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पूर्वी ज्या ज्या शैक्षणिका विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना अद्याप त्रुटी आहेत व त्रुटींची पूर्तता झालेली नाही. अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती/प्रवेश नियामक प्राधिककरणाची मान्यता प्राप्त नाही. अशा विद्यार्थ्यांची /संस्थांची अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय माहिती

| Sr. No. | Course Name | Name of the Institute | Details regarding not submission of documents, discrepancy not cleared & non Approval of admission | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Application ID | Name of Student | Cast |
| | | | | | |

माहिती सादर करताना प्रथम संस्थेचा डीटीई कोड टाकावा नंतर विषयामध्ये Caste Validity Pending information असे नमूद करावे नंतर excel file attach करावी . सदर माहिती Time New Roman या font मध्ये सादर करावी. वरील विवरणपत्र अ व ब मधील माहिती संचालनालयामार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करावयाची असल्याने तात्काळ माहिती या कार्यालयास सादर करावी.

(दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स 2269 2102
E-Mail: desk1a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे / कालमर्यादित
२६.८.२०१९

क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ ६८५
दिनांक : 21 AUG 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न करणेबाबत आणि
संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या त्रुटींबाबत प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता नसलेल्या तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर न केलेल्या प्रकरणांबाबत अहवाल सादर करणेबाबत

संदर्भ :
1. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१९/ प्र.क्र.१०५/ तांशि-४, दिनांक ४.७.२०१९
2. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/५४६, दिनांक १२.७.२०१९ आणि क्रमांक २अ/एडीएम/२०१९/५९३, दिनांक २९.७.२०१९
3. प्रवेश नियामक प्राधिकरण, म.राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रनिप्रा/प्र.अ.१५८/प्रवेश/त्रुटी/७२४, दिनांक २.८.२०१९
4. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/६१७, दिनांक ५.८.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि या मुदतीत जे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय तपशिलवार माहिती अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करणे / न करणे याबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी शासनाने संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये मागितली आहे. यासंदर्भाने संचालनालयाने संदर्भाधीन पत्र क्रमांक २ अन्वये आपल्या अधिनस्त संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती मागविलेली होती.

संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी २०१७-१८ पूर्वी ज्या ज्या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी आहेत व सदर त्रुटींची पूर्तता झालेली नसल्याने अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त नाही तसेच ज्या संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांची तपासणी व तदनुषंगाने तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केलेली नाही अशा विद्यार्थी / संस्थांचा अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय अहवाल सादर

करण्यास कळविले होते. यासंदर्भाने संचालनालयाने संदर्भाधीन पत्र क्रमांक ४ अन्वये आपल्या अधिनस्त असलेल्या संस्थांकडील अहवाल सादर करण्यास कळविलेले होते.

या अनुषंगाने काही विभागीय कार्यालयांकडून संचालनालयास माहिती प्राप्त झाली. मात्र खेदाने नमूद करण्यात येते की, विभागांतील संपूर्ण संस्थांची माहिती सादर न करता केवळ काही मर्यादित संस्थांची माहिती सादर केलेली आहे. विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून माहिती घेऊन ती सादर करणे अपेक्षित आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट २०१८ पर्यंत देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या मुदतीत जे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय माहिती

२) २०१७-१८ पूर्वी ज्या ज्या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी आहेत व सदर त्रुटींची पूर्तता झालेली नसल्याने अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त नाही तसेच ज्या संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांची तपासणी व तदनुषंगाने तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केलेली नाही अशा विद्यार्थी / संस्थांचा अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय अहवाल

उपरोक्त प्रकरणी यापूर्वी सादर केलेली माहिती अपूर्ण अथवा सर्व संस्थांकडून घेऊन सादर केलेली नसल्याचे निदर्शनास आल्याने आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांकडून प्राधान्याने माहिती घ्यावी व वरील दोन्ही प्रकरणाबाबतची माहिती तथा अहवाल प्रमाणित करुन दिनांक २६.८.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संचालनालयास खालील प्रपत्रात ई मेल द्वारे (सॉफ्ट कॉपी व पीडीएफ अशा दोन्ही पध्दतीत) सादर करण्यात यावी. यापूर्वी पाठविलेल्या माहितीत बदल नसल्यास अशा प्रकरणीसुध्दा पुन: ती माहिती सादर करण्यात यावी.

**विवरणपत्र अ) मुद्दा क्रमांक १ संदर्भाने माहिती**

| अभ्यासक्रम | संस्थेचे नाव | जात वैधता सादर करु न शकलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | जात वैधता सादर करु न शकलेल्या विद्यार्थ्यांचे ॲप्लीकेशन आय डी, नाव व प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | | |

**विवरणपत्र ब) मुद्दा क्रमांक २ संदर्भाने माहिती (१)**

२०१७-१८ पूर्वी ज्या ज्या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी आहेत व सदर त्रुटींची पूर्तता झालेली नसल्याने अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त नाही, अशा विद्यार्थी / संस्थांचा अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय

| शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रम | संस्थेचे नाव | विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी असून त्या त्रुटींची पूर्तता झालेली नसल्यामुळे मान्यता प्राप्त नाही त्यांची माहिती |
|---|---|---|---|

| विवरणपत्र क) मुद्दा क्रमांक संदर्भाने माहिती (२) | | | |
|---|---|---|---|
| ज्या संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांची तपासणी व तदनुषंगाने तत्कालिन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केलेली नाही अशा विद्यार्थी / संस्थांचा अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय | | | |
| शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रम | संस्थेचे नाव | प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांची तपासणी न केलेल्या परिणामी मान्यता प्राप्त केलेली नाही त्यांची माहिती |

वरील विवरणपत्र अ तसेच ब , क मधील माहिती अनुक्रमे शासनास व प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करावयाची असल्याने व माहितीवर आधारीत धोरण निश्चित होणार असल्याने या प्रकरणी कालमर्यादा पाळून सर्व संस्थांची माहिती सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीसाठी अग्रेषित

१. मा.सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२
२. मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई